| MHNS240001862016 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | २५.०१.२०१६ |
| | नोंदणी तारीख | : | २५.०१.२०१६ |
| | निकाल तारीख | : | २२.०६.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | १० ०४ २८ |
| | निशाणी | | ३३/ब |

**<u>सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात</u>**

**<u>ता. बागलाण, जिल्हा– नाशिक.</u>**

(पिठासन अधिकारी – मधुसूदन दिनकर महाडीक)

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र.३०/२०१६</u>**

गुन्हा नोंद क्र.१८/२०१६.

| | |
|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | **महाराष्ट्र शासन**<br>**मार्फत पोलीस निरीक्षक,**<br>सटाणा पोलीस स्टेशन,<br>ता.बागलाण, जि. नाशिक |
| **अभियोग पक्षातर्फे** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्री. अतुल महाजन. |
| **आरोपी** | **राजेंद्र सदाशिव येलपले,** वय ५१ वर्षे,<br>रा.दुध डेअरीसमोर, पंढरपूर, पुणे रोड,<br>ता.पंढरपूर, जि.सोलापूर |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | श्री. एस. आर. सोनवणे. |

**<u>भाग – ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | सन २०११–२०१२ दरम्यान |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २०.०१.२०१६ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २५.०१.२०१६ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | ०६.१२.२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | २२.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजेंद सदाशिव यलपले | ०३.०३.२०१५ | ०६.०३.२०१५ | भादवी कलम ४०९ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रामदास जिभाउ पाटील | फिर्यादी | ३० |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३१ | फिर्याद |

## न्यायनिर्णय

### (घोषणा तारीख– २२.०६.२०२६)

प्रस्तूत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०९ या अपराधासाठी दाखल आहे.

०२. **अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

फिर्यादी रामदास जिभाउ पाटील याने सटाणा पोलीस स्टेशन येथे अशी फिर्याद दिली की, सन २०११–१२ मध्ये आरोपी हा सटाणा येथील आर.बी. हर्बल ॲग्रो कंपनीत विक्री प्रतिनिधी म्हणून नोकरीस होता. त्याच्यावर ग्राहकांना माल पुरवून त्याची रक्कम वसूल करून कंपनीकडे जमा करण्याची जबाबदारी होती. आरोपीने फिर्यादीच्या व कंपनीच्या विश्वासास पात्र ठरून विविध संस्थांकडून मालापोटी एकूण रु. ३,५५,१२२/– रक्कम वसूल केली; मात्र ती कंपनीकडे जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून तिचा अपहार केला. त्यामुळे त्याने फिर्यादी व कंपनीचा विश्वासघात करून भा.दं.वि. कलम ४०९, ४०८ व ४२० अन्वये गुन्हा केला असल्याची तक्रार आहे.

०३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर १८/२०१६ ने नोंदविली व त्यानंतर तपासी अधिकारी यांनी तपास टिपणे नोंदविले, आरोपींना अटक केली. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. या प्रकरणात आरोपींविरुध्द (निशाणी १०) भा.द.वि कलम ४०९ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**०५.** अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, सन २०११-१२ मध्ये आरोपी हा सटाणा येथील आर.बी. हर्बल ॲग्रो कंपनीत विक्री प्रतिनिधी म्हणून नोकरीस होता. त्याच्यावर ग्राहकांना माल पुरवून त्याची रक्कम वसूल करून कंपनीकडे जमा करण्याची जबाबदारी होती. आरोपीने फिर्यादीच्या व कंपनीच्या विश्वासास पात्र ठरून विविध संस्थांकडून मालापोटी एकूण रु. ३,५५,१२२/- रक्कम वसूल केली; मात्र ती कंपनीकडे जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून तिचा अपहार केला. त्यामुळे त्याने फिर्यादी व कंपनीचा विश्वासघात केला व त्याद्वारे भारतिय दंड विधान कलम ४०९ अन्वये अपराध केला ? | **नकारार्थी.** |
| **२.** | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## युक्तिवाद

**०६.** अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. अतुल महाजन आणि आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.आर.सोनवणे यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ व २ करिता –

**०७.** मुद्दा क्र.१ व २ हे संलग्न असुन त्यावरील पुरावा देखील सारखाच आहे. त्यामुळे सदर सर्व मूद्दे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रितरित्या विवेचित करण्यात येत आहे.

०८. फिर्यादी रामदास जिभाउ पाटील (सा.क्र.०१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, प्रस्तुत प्रकरणातील घटना सन २०११ ते २०१२ मध्ये आरोपींना आर.बी.हर्बल ॲग्रो कंपनीतील माल ग्राहकांना पुरवून त्याची रक्कम वसूल करून कंपनीकडे जमा करण्याची जबाबदारी दिले होते. त्याची साधारणता किंमत रक्कम रु.३,००,०००/– इतके होते. मात्र ती कंपनीकडे जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून तिचा अपहार केला. त्यानंतर त्यांनी सटाणा पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली.

०९. फिर्यादीने उलटतपासात त्याने कबुल केले की, त्यांच्यामध्ये समजुत झाली आहे. आरोपीने त्याबदल्यात त्यांना धनादेश दिला आहे. सदर समजूत स्टॅम्प पेपरवर करण्यात आली आहे. आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही. आरोपीकडून किती रक्कम येणे होती हे त्यांना सांगता आले नाही. आरोपीने किती तारखेला किती रक्कम अदा केली हे देखील साक्षीदाराला सांगता आले नाही. आरोपीकडून कोणतेही येणे रक्कम बाकी नाही. आरोपीने कोणत्या गि–हाईकांकडून किती रक्कम कोणत्या तारखेला घेतली हे साक्षीदाराला सांगता आले नाही.

१०. एकंदरीत फिर्यादी यांच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता, फिर्यादी यांनी आरोपींविरुध्द आर.बी.हर्बल ॲग्रो कंपनीतील माल ग्राहकांना पुरवून त्याची रक्कम वसूल करून कंपनीकडे जमा करण्याची जबाबदारीची रक्कम रुपये ३,००,०००/– अदा न केल्यामुळे फिर्याद दिल्याचे कथन केले आहे. याउलट फिर्यादी निशाणी ३१ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये आरोपीने अपहार रक्कम ही ३,५५,१२२/– असल्याचे विसंगत कथन केले आहे. या अनुषंगाने फिर्यादी यांचा पुरावा पाहिला असता, साक्षीदार यास निश्चीत एकूण येणे रक्कम तपशिलवार सांगता आलेली नाही. तसेच आरोपींनी रक्कम अदा केलेबाबत कबूली देण्यात आलेली आहे. फिर्यादी यांची आरोपींविरुध्द तक्रार नसल्याची व त्यांचेदरम्यान तडजोड झाली असल्याबाबत कबूली दिली आहे. एकंदरीत फिर्यादी यांची साक्ष पाहिली असता, त्यामध्ये उभयपक्षकारांमध्ये झालेल्या व्यवहाराबाबतचा कोणताही तपशिल नमूद करण्यात आलेला नाही. निश्चीत

येणे रकमेचा उल्लेख दिसून येत नाही. व्यवहाराचा दिनांक, कालावधी नमूद करण्यात आलेला नाही. याशिवाय, आरोपींनी दिलेला चेक व त्या अनुषंगाने असलेले दस्तऐवज शाबीत करण्यात आलेले नाही. उभयपक्षकारांच्या दरम्यान झालेल्या कराराची कोणतीही कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आलेले नाही. याशिवाय, या साक्षीदाराने कबूल केल्याप्रमाणे त्यांची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे दिसून येते. उपरोक्त सर्व बाबींचे अवलोकन केले असता, आरोपींविरुध्द कथित अपराध रास्त शंकेपलिकडे शाबीत होत नाही. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## : आदेश :

१. आरोपी **राजेंद्र सदाशिव येलपले** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४०९ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी यांचा जामीन मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सदर आदेशापासुन एक महिन्याचे आत सादर करावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.06.22 15:01:43 +0530

**दिनांक– २२.०६.२०२६.**

**(मधुसूदन दिनकर महाडीक)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं. ३,**
**सटाणा.**

...................................................................................................

## CERTIFICATE

*I affirm that the contents of this P. D.F. file Order are same, word to word, as per the original Order.*

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | : | R. A. Bhaskar |
| Court | : | J.M.F.C. Satana (Court No.3) |
| Date | : | 22.06.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 22.06.2026 |
| Order uploaded on | : | 22.06.2026 |

...................................................................................................